वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ पाने ४ किंमत ३

# मुस्लिम परस्पर संमतीने घेऊ शकतात तोंडी तलाक, लेखी करार आवश्यक नाही

उच्च न्यायालयाचा महत्वाचा निर्णय

Email.- dailydivyawarta@Gmail.com

Email.-editordivyawarta@gmail.com



दिव्य वार्ता

## गुजरात उच्च न्यायालयाने निर्णय दिला की मुस्लिम विवाह 'मुबारत' पद्धतीने परस्पर संमतीने संपुष्टात आणता येतो

### न्यायालयाने कुराण, हदीस आणि वैयक्तिक कायद्याचा आधार घेत कुटुंब न्यायालयाचा निर्णय रद्द केला

मुंबई , (दिव्य न्युज):- मुस्लिमांच्या घटस्फोटाबाबत (तलाक) गुजरात उच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. उच्च न्यायालयाने म्हटले आहे की मुस्लिम विवाह 'मुबारत' म्हणजेच परस्पर संमतीने घटस्फोटाद्वारे संपुष्टात आणता येतो आणि यासाठी लेखी संमतीची आवश्यकता नाही.

न्यायमूर्ती ए.वाय. कोगेजे आणि न्यायमूर्ती एन.एस. संजय गौडा यांच्या खंडपीठाने घटस्फोटाच्या प्रक्रियेवर कुराण आणि हदीसचा हवाला देत राजकोट कुटुंब न्यायालयाचा आदेश रद्द केला, ज्याने मुस्लिम जोडप्याने दाखल केलेला खटला रद्द केला, ज्यामध्ये मुबारतद्वारे घटस्फोटाची मागणी केली होती.

कुटुंब न्यायालय कायद्याच्या कलम ७ अंतर्गत हा खटला कायम ठेवण्यायोग्य नाही असे कुटुंब न्यायालयाने म्हटले होते कारण परस्पर संमतीने घटस्फोटासाठी कोणताही लेखी करार नव्हता. वैवाहिक मतभेदामुळे जोडप्याने वेगळे होण्याचा निर्णय घेतला होता.उच्च न्यायालयाला कुटुंब न्यायालयाच्या निर्णयातही दोष आढळला की घटस्फोटासाठी लेखी करार आवश्यक आहे कारण तो कुराण, हदीस किंवा वैयक्तिक कायद्याअंतर्गत मुस्लिमांमध्ये पाळल्या जाणाऱ्या प्रथेशी विरोधाभास करत नाही.

#### 'मुबारत' म्हणजे काय?

मुबारत ही मुस्लिम विवाह संपुष्टात आणण्याची पद्धत आहे ज्यामध्ये पती-पत्नी परस्पर संमतीने घटस्फोट घेतात.
'मुबारत'साठी लेखी करार आवश्यक आहे का?
गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, लेखी कराराची आवश्यकता नाही; तोंडी संमती पुरेशी आहे.
हा निर्णय कोणत्या न्यायालयाने दिला?
हा निर्णय गुजरात उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती ए.वाय. कोगेजे आणि न्यायमूर्ती एन.एस. संजय गौडा यांच्या खंडपीठाने दिला.
कुटुंब न्यायालयाचा आधीचा निर्णय काय होता?
कुटुंब न्यायालयाने लेखी करार नसल्याने खटला ग्राह्य धरला नव्हता.

'एआयएमआयएम'ला मोठा धक्का

## धुळे कार्यकारिणीचा सामूहिक राजीनामा




मुंबई , (दिव्य न्युज):- धुळे जिल्ह्यातील शहर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार फारुक शाह यांनी पक्ष सोडला होता. आता जिल्हा कार्यकारिणीनं सामूहिक राजीनामे दिले आहेत.

▶▶ पान २ वर

## वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीत पंकजा-धनुभाऊंना प्रचंड यश

### पवारांचे उमेदवार राजाभाऊ फड यांचे डिपॉजिट जप्त





बीड, (दिव्य न्युज):- वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राजाभाऊ फड यांचा दारुण पराभव झालाय. राजाभाऊ फड यांना केवळ १४०७ मतं मिळाली असून त्यांच्या समोरील उमेदवार रमेश कराड यांचा १४३१६ मतांनी विजय झाला आहे.

परळी येथील वैद्यनाथ अर्बन बँकेच्या १७ जागांपैकी १३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला. बँकेच्या १७ संचालक मंडळाच्या जागांसाठी रविवारी १०८ केंद्रावर मतदान पार पडले. बँकेच्या ४ जागा बिनविरोध निवडल्या गेल्या आहेत. महिला मतदार संघातून डॉ. प्रीतम गोपीनाथ मुंडे, माधुरी योगेश मेनकुदळे, ओबीसी मतदार संघातून अनिल तांदळे तर अनुसूचित जाती मतदार

▶▶ पान २ वर

## नोकरीवरून काढण्याची धमकी देत अत्याचार, ब्लॅकमेलिंग

### माजी सभापतीच्या पतीचा कारनामा



बीड, (दिव्य न्युज):- नोकरीवरून काढण्याची धमकी देत शासकीय महिला कर्मचाऱ्यावर बलात्कार केल्याप्रकरणी गेवराई पंचायत समितीच्या माजी सभापतींचे पती तथा एका राजकीय पक्षाच्या माजी तालुकाध्यक्षाचा मुलगा दीपक प्रकाश सुरवसे (रा. खांडवी, गेवराई, जिल्हा बीड) याच्यावर वेदांतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३५ वर्षीय महिलेने या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. २०१९मध्ये तक्रारदार महिला शासकीय सेवेत रुजू झाली. त्यावेळी दीपकची पत्नी पंचायत समिती सभापती पदी नियुक्त

▶▶ पान २ वर

ज्या न्यायाधीशाच्या घरी जळालेल्या नोटा सापडल्या त्याला

## पदावरून हटवण्याची प्रक्रिया सुरु-ओम बिर्ला

मुंबई , (दिव्य न्युज):- न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या विरोधात कॅश कांड प्रकरणात मोठी कारवाई झालीय. लोकसभेचे स्पीकर ओम बिर्ला यांनी मंगळवारी दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या विरोधात महाभियोगाचा प्रस्ताव स्वीकारला. हा प्रस्ताव १४६ खासदारांच्या स्वाक्षरीसह सादर करण्यात आला. न्यायाधीश वर्मा यांच्या विरोधातील तक्रारी गंभीर असल्याचे मान्य करत या प्रकरणाच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

भारताच्या तत्कालीन

▶▶ पान २ वर



## बीडच्या गुन्हेगारांसारखच बीडचे तुरुंगही कुरव्यात

### मोबाईल अन् ड्रग्जचा सुळसुळाट




बीड, (दिव्य न्युज):- मागील सहा महिन्यांपासून बीड जिल्हाकारागृह (इशशव छ्शुी) सतत कोणत्या ना कोणत्या कारणास्तव चर्चेत आहे. याच कारागृहात सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड आहे. या कारागृहात मोबाईल आणि अंमली

पान २ वर

## महाराष्ट्र पोलीस दलात १५ हजार जागांवर भरतीस मंजुरी

मुंबई , (दिव्य न्युज):- गेल्या अनेक दिवसांपासून पोलिस दलात भरतीच्या तयारीत असलेल्या युवकांना भाजप महायुती सरकारने खुशखबर दिली आहे. महाराष्ट्र पोलिस दलात सुमारे १५००० हजार जागांवर भरतीचा निर्णय घेण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठक झाली. या बैठकीत महाराष्ट्र पोलिस दलात १५००० जागांवर भरतीच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवपरींळी) यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकी गृहविभाग, अन्न, नागरी पुरवठा विभाग, विमानचालन विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी

▶▶ पान २ वर

मंत्रालयात प्रवेश मिळवण्यासाठी नवीन नियम लागू

## १५ ऑगस्टपासून अंमलबजावणी होणार




मुंबई , (दिव्य न्युज):- मुंबईतील मंत्रालयात प्रवेश घेणाऱ्यांसाठी आता महत्त्वाचा बदल होत असून, १५ ऑगस्ट २०२५ पासून 'डिजी प्रवेश पास'शिवाय मंत्रालयात प्रवेश मिळणार नाही. महाराष्ट्र शासनाच्या गृहविभागाने ११ ऑगस्ट रोजी यासंदर्भातील आदेश जारी केले असून, प्रत्यक्ष स्वरूपात पास देण्याची पद्धत थांबवण्यात आली आहे.मंत्रालयात प्रवेश घेण्यासाठी आता ऑनलाईन पद्धतीचा 'डिजी प्रवेश पास'

▶▶ पान २ वर




धारूरमध्ये मिलीया शाळेसह अंजुमन इशातेतालीम संस्थेच्या शाळांवर गंभीर आरोप

## पालक वर्गाचे आमरण उपोषण, भरती प्रक्रियेत अपारदर्शकता उघड

धारूर (दिव्य न्युज):- शहरातील मिलीया प्राथमिक व माध्यमिक शाळेसह अंजुमन इश-ते-तालीम संस्थेच्या अधिपत्याखालील धारूर, परळी, आंबेजोगाई आणि बीड परिसरातील विविध शाळांमध्ये कारभारातील गंभीर अनियमितता, वेळापत्रकातील मनमानी, शिक्षक गैरहजेरी आणि अपात्र व्यक्तींची भरती या मुद्द्यांवरून पालक वर्ग, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक अभ्यासकांनी जोरदार आवाज उठविला आहे. धारूर येथील गट शिक्षणाधिकारी

▶▶ पान २ वर

#### स्थानिक पातळीवर खळबळ

या आंदोलनामुळे धारूरसह परळी, आंबेजोगाई आणि बीड परिसरात मोठी चर्चा रंगली आहे. शैक्षणिक संस्थांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शासन आणि शिक्षण विभागाची भूमिका काय राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




#### शांततामय आंदोलन, पण भूमिका ठाम

गट शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर पालक वर्ग शांततामय पद्धतीने बसून घोषणाबाजी करत आहे. शिक्षण विभागाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार उपोषणकर्त्यांनी व्यक्त केला आहे. हे फक्त आमच्या मुलांचे नाही, तर संपूर्ण समाजाच्या भविष्यासाठीचे आंदोलन आहे, असे एका पालक प्रतिनिधीने स्पष्ट केले.

# गाझा सिटी ताब्यात घेण्याच्या इस्त्रायलच्या योजनेवर पाच मुस्लिम देशांनी दिला इशारा?

दिल्ली, (वृत्तसेवा):- इस्त्रायलच्या सुरक्षा कॅबिनेटनं गाझा सिटी ताब्यात घेण्याच्या योजनेला मंजूरी दिली आहे. गाझामध्ये सुरू असलेल्या युद्धातील हा एक मोठा आणि वादग्रस्त निर्णय असल्याचं मानलं जातं आहे.गाझा पट्टीच्या उत्तर भागात गाझा सिटी हे शहर आहे. गाझातील युद्ध सुरू होण्याआधी तो गाझा पट्टीतील सर्वाधिक लोकसंख्येचा परिसर होता. तिथे लाखो पॅलेस्टिनी लोक राहत होते.

संयुक्त राष्ट्रसंघानं इशारा दिला आहे की, इस्त्रायलच्या या निर्णयामुळे 'मोठ्या प्रमाणात सक्तीचं विस्थापन' आणि 'अधिक हत्या' होऊ शकतात. तर हमासनं या निर्णयाला 'जोरदार विरोध' करणार असल्याचं म्हटलं आहे.इस्त्रायलच्या या निर्णयावर जगभरातून प्रतिक्रिया उमटल्या आहेत. विशेषकरून मुस्लिम देशांना या निर्णयामुळे गाझामधील मानवीय संकट आणखी गंभीर होईल असं म्हटलं आहे.सौदी अरेबिया, पाकिस्तान, कतार, कुवैतसह अनेक देशांनी आणि इस्लामिक सहकार्य संघटनेनं (ओआयसी) इस्त्रायलचा हा निर्णय म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन, दोन राष्ट्र अस्तित्वात आणण्यात अडथळा आणि पॅलेस्ट्रिनी जनतेच्या अधिकारांवरील थेट हल्ला असल्याचं म्हटलं आहे.



सौदी अरेबियानं इस्त्रायलच्या या निर्णयाचा निषेध केला आहे. हा निर्णय म्हणजे गाझामध्ये उपासमार वाढवण्याच्या आणि पॅलेस्टिनी नागरिकांच्या वांशिक नरसंहाराच्या धोरणाचा भाग असल्याचं सौदी अरेबियानं म्हटलं आहे.सौदी अरेबियाच्या परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या वक्तव्यात म्हटलं आहे की, जर आंतरराष्ट्रीय समुदाय आणि सुरक्षा परिषदेनं इस्त्रायलचे हल्ले आणि कायद्याचं उल्लंघन ताबडतोब थांबवलं नाही, तर यामुळं आंतरराष्ट्रीय व्यवस्था आणि वैधतेचा पाया कमकुवत होईल.तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण होईल आणि नरसंहार आणि जबरदस्तीनं विस्थापन करण्यास प्रोत्साहन देणारी परिस्थिती निर्माण होईल.सौदी अरेबियानं असंही म्हटलं आहे की, इस्त्रायल करत असलेल्या गुन्ह्यांना रोखण्यासाठी जगाला ठोस, भक्कम आणि कठोर पावलं उचलावी लागतील. जेणेकरून पॅलेस्टिनी लोकांवरील मानवीय संकट नष्ट करता येईल.




कतारनं देखील इस्त्रायलच्या या योजनेचा निषेध केला आहे. कतारच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे की या निर्णयामुळे गाझामधील मानवीय संकट आणखी गंभीर होईल तसंच शस्त्रसंधीचे प्रयत्न कमकुवत होतील.कतारच्या वक्तव्यात म्हटलं आहे, इस्त्रायल सातत्यानं आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदे आणि प्रस्तावांचं उल्लंघन करत आहेत. यात युद्धात अन्नाचा वापर शस्त्राप्रमाणे करणं आणि सर्वसामान्य लोकांना मुद्दाम उपाशी ठेवणं याचा समावेश आहे.

शरीफ म्हणाले, या समस्येमागचं खरं कारण आपण विसरता कामा नये. ते पॅलेस्टिनी जमिनीवर इस्त्रायलनं प्रदीर्घ काळापासून केलेल्या बेकायदेशीर कब्जामध्ये आहे. जोपर्यंत हा कब्जा राहील, तोपर्यंत शांतता प्रस्थापित होणार नाही.ते पुढे म्हणाले, आम्ही आंतरराष्ट्रीय समुदायाला आवाहन करतो की त्यांनी यात तात्काळ हस्तक्षेप करून इस्त्रायलला विनाकारण आक्रमण करण्यापासून रोखावं.निर्दोष नागरिकांच्या सुरक्षेची खातरमजा करावी आणि गाझामधील लोकांपर्यंत अत्यावश्यक मानवीय मदत पोहोचेल याची खातरजमा करावी.

कुवैतनं इस्त्रायलची ही योजना म्हणजे आंतरराष्ट्रीय आणि मानवीय कायद्याचं उल्लंघन असल्याचं म्हटलं आहे. कुवैतनं म्हटलं आहे की दोन-राष्ट्रांच्या संकल्पनेची शक्यता यामुळे कमकुवत होईल.कुवैतच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून वक्तव्यं देण्यात आलं की, सुरक्षा परिषद आणि आंतरराष्ट्रीय समुदायानं त्यांची जबाबदारी पार पाडत या अमानवीय कारवाया थांबावाव्या, सीमा खुल्या करून गाझा पट्टीत पुरेशी आणि तात्काळ मदत पोहोचू द्यावी आणि उपासमारी आणि वांशिक नरसंहाराचं इस्त्रायलचं हे धोरण थांबवावं.इस्लामिक सहकार्य संघटनेनं (ओआयसी) म्हटलं आहे की, गाझा पट्टीवर पुन्हा कब्जा करण्यासाठी आणि मोठ्या संख्येनं पॅलेस्टिनी लोकांना विस्थापित करण्याच्या योजनेमुळे तिथे सध्या असलेली स्थिती आणखी बिघडू शकते.

या वक्तव्यात मागणी करण्यात आली की, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदनं तात्काळ आणि ठोस पावलं उचलून कायमस्वरुपी आणि व्यापक स्वरुपाची शस्त्रसंधी लागू करावी. गाझा पट्टीच्या प्रत्येक भागात मानवीय मदत आणि आवश्यक सामान पुरेशा प्रमाणात कोणत्याही अडथळ्याशिवाय पोहोचेल याची खातरजमा करावी. पॅलेस्टिनी लोकांसाठी प्रभावी आंतरराष्ट्रीय सुरक्षा पुरवावी.ओआयसीनं म्हटलं आहे, आंतरराष्ट्रीय समुदायानं इस्त्रायलनं केलेला कब्जा संपवण्यासाठी आवश्यक ती पावलं उचलावीत, जेणेकरून पॅलेस्टिनी लोकांना १९६७ पासून कब्जा करण्यात आलेल्या प्रदेशात त्यांच्या स्वंतत्र देशाचं सार्वभौमत्व मिळवता यावं आणि त्याची राजधानी जेरुसलेम असावी.

पान ४ वरून

## वासुदेव घोडके यांच्या

बहिण,मुले,मुली,सुना,जावाई, नातवंडं पातवंड,नातेवाईक, पाहुणे मंडळी, मित्रमंडळी व त्यांच्या वर प्रेम करणारे सैकडो लोक या ठिकाणी उपस्थित आहेत हीच त्यांची खरी कमाई आहे.आज पंचाहत्तर वर्षे वयात ही ते ठणठणीत आहे.परमेश्वर त्यांच्या शताब्दी महोत्सव आम्हाला साजरा करण्याची संधी देवो हीच प्रार्थना आम्ही सर्व करत आहेत.यावेळी माजी जि.प.सदस्य भारत काळे,माजी शिक्षण विस्तार अधिकारी रसाळ सर यांच्या सह अनेकांनी त्यांना शुभेच्छापर भाषणे झाली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मराठा योध्दा नामदेवराव घोडके यांनी केले आहे
.

यावेळी सरपंच विष्णू घोडके,विश्वंभर घोडके, रामहरी घोडके,विश्वंभर जगदाळे, भगवान कदम, चेअरमन घोडके मामा,शहाजी सुरवसे,बाळु काका शिंदे, दिगंबर सुरवसे, रामभाऊ शिंदे,आदी बालाघाट पंचक्रोशीतील गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,से.सा.सो.चेरमन, संचालक, विविध क्षेत्रातील अधिकारी कर्मचारी शेतकरी, पत्रकार, महिला मंडळ प्रचंड संख्येने उपस्थित होते.

## गेवराई तालुक्यात कुशल

तपासणी पथके तयार करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.त्यामुळे आता महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये लाखोचा घोटाळा उघड होईल अशी चर्चा तालुक्यात होत आहे.

गेवराई पंचायत समिती मागील अनेक दिवसापासून एक ना अनेक कामामुळे जिल्ह्यात चर्चेचा विषय बनली असून मागील काळात तालुक्यातील धोंडराई,तलवाडा यासारख्या मोठ्या ग्रामपंचायत सह अनेक ग्रामपंचायत मध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे कामे बोगस कामे झाले असल्याचे उघड झाले होते परंतु त्यावेळी मोठी कारवाई करण्यात आली नाही,परंतु आता तालुक्यातील मोहगणी वृक्ष लागवडीच्या कुशल बीलाचे प्रकरण समोर आले असून कुशल बिलाची रक्कम पंधरा दिवसापूर्वी लाभार्थ्यांच्या खात्यात ऑनलाइन जमा झाली असून काही लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणे बाकी आहे.परंतु अनेक ठिकाणी मोहगणी वृक्ष लागवडच झाली नसल्याने पैसे खात्यात कसे काय जमा केले,प्रस्ताव कोणी तयार केले,हा संशयित प्रश्न उपस्थित होत आहे.त्यामुळे गटविकास अधिकारी यांनी तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या अंतर्गत गाव निहाय वृक्ष लागवड झाली की नाही हे शेतात जाऊन स्थळ पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत त्याच बरोबर या संबंधीचे सर्व अभिलेखे,रेकॉर्ड उपलब्ध करून तत्काळ अहवाल पंचायत समिती कार्यालयात सादर करण्याच्या सूचना पथक प्रमुख यांना दिल्या असल्याने आता हे पथक कधी पाहणीसाठी गावात येऊन शेतात पाहणी करतात हे पहावे लागेल.

पान १ वरून

## धुळे कार्यकारिणीचा

पदाधिकाऱ्यांनी एकदम राजीनाम्याची भूमिका घेतल्याने खळबळ उडाली आहे.

एआयएमआयएम पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीने एक सोबतच पक्षाचा राजीनामा दिला. धुळे शहर कार्यकारिणीने सामूहिक राजीनामा दिल्याने पक्षात मोठी खळबळ उडाली आहे. एआयएमआयएम पक्षाला मोठा धक्का बसला आहे.एआयएमआयएमचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष मुक्तार बिल्डर, महिला जिल्हाध्यक्ष डॉ. दीपश्री नाईक, शहराध्यक्ष फातिमा अन्सारी, युवा अध्यक्ष रफिक पठाण यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा राजीनामा देण्यामध्ये समावेश आहे. राजीनामा देताना पदाधिकाऱ्यांनी पक्षश्रेष्ठींच्या दुर्लक्षपणावर खापर फोडलं आहे.

पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून धुळ्यातील स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या मागे ताकद उभे करण्याकडे दुर्लक्ष करत आहेत. त्याला कंटाळून हा निर्णय घेतल्याचं राजीनामा पत्रात नमूद केलं आहे. पदाधिकाऱ्यांना पक्षाकडून ताकद मिळत नसल्याने, लोकांच्या समस्यांवर काम करताना मर्यादा येतात. परिणामी स्थानिकांमध्ये पक्षश्रेष्ठींबाबत नाराजी आहे.सर्व नाराज पदाधिकाऱ्यांनी आपले राजीनामा जिल्हाध्यक्ष नासीर पठाण यांच्याकडे सादर केले आहेत. या राजकीय घडामोडीमुळे धुळ्यात एआयएमआयएमला धक्का बसला आहे. धुळे शहर कार्यकारिणीच्या राजीनाम्यापूर्वी गेल्या महिन्यात माजी आमदार फारुक शाह यांनी पक्ष सोडला.अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फारुक शाह यांनी प्रवेश केला आहे. फारुक शाह हे मागील निवडणुकीत भाजपचे आमदार अनुप अग्रवाल यांच्याविरोधात लढले होते आणि दुसऱ्या क्रमांकाची लक्षवेधी मते घेतली होती.

## नोकरीवरून काढण्याची

होती; परंतु त्यांच्याऐवजी दीपकच पंचायत समीतीचे सर्व काम पाहत होता. कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांच्या बैठका घेत सूचना करत होता. त्यामुळे तक्रारदार महिला व दीपकची ओळख होती. तक्रारीत नमूद आरोपानुसार, २०२२ मध्ये विभागाच्या कामाचे कारण करून दीपकने महिलेला शहरातील वेदांतनगरमधील एका बड्या हॉटेलमध्ये बोलावले. तेथील खोलीत बोलावून महिलेसोबत जबरदस्ती केली. महिलेने त्याला विरोध केला. मात्र, दीपकने 'तुला नोकरी गमवावी लागेल,' अशी धमकी देत अत्याचार केला.

व्हिडीओ, छायाचित्राचा आधार घेत दीपकने महिलेला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. कुटुंबाला व्हिडीओ, छायाचित्र पाठविण्याची धमकी देत महिलेवर इगतपुरी, नाशिक, शहरातील पडेगाव भागात अत्याचार केले. बदनामीच्या भीतीने महिला त्याचा छळ सहन करत होती. मे २०२५ मध्ये त्याने महिलेला पतीपासून घटस्फोट घेण्यास भाग पाडले. त्याच्या छळाला कंटाळून महिला काही महिन्यांपूर्वी शहरात स्थायिक झाली. २ जुलै रोजी दीपकने शहरात येऊन, महिलेच्या घराजवळ मोठमोठ्याने गोंधळ घातला. मुलांना व्हिडीओ दाखवण्याची धमकी देत धक्काबुक्की केली. ३ जुलै रोजी महिलेने त्याच्या वडिलांना सर्व प्रकार सांगितला. तेव्हा त्याच्या वडिलांनी देखील महिलेला शिवीगाळ करून तक्रार केल्यास नोकरीवरून काढण्याची धमकी देत हाकलून लावले.

महिलेने याप्रकरणी बीड पोलिसांकडे तक्रार केली. बीड पोलिसांनी ती शहर पोलिसांकडे वर्ग केली. वेदांतनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिस अटकेसाठी त्याच्या घरी जाण्यापूर्वीच दीपक पसार झाला होता. त्याला लवकरच अटक केली जाईल, असे वेदांतनगरच्या निरीक्षक प्रविणा यादव यांनी सांगितले.

## वैद्यनाथ बँकेच्या

संघातून विनोद जगतकर हे बिनविरोध निवडणूक आले.

बँकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच शरद पवार गटाने उमेदवार दिले होते. शरद पवार गटाचे तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यात प्रामुख्याने राजाभाऊ फड यांचा दारुण पराभव झाला आहे. वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच मुंडे बहीण भाऊ एकत्र होते. पंकजा मुंडे यांनी आपले वर्चस्व कायम राखल्याचे दिसून आले.विजयी उमेदवार रमेश कराड म्हणाले, धनुभाऊ आणि पंकजा मुंडे यांच्या पॅनेलचा दणदणीत विजय मिळाला आहे. ९५ टक्क्यांच्या पुढे मुंडे बहीण भावाच्या पॅनेलला मतदान मिळाले आहे.या निवडणुकीत अजिबातच रस्सीखेच नव्हती. शरद पवार गटाला तर उमेदवारही मिळाले नाहीत. त्यांच्या उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. मुंडे बहीण भाऊ एकत्र आल्यानंतर वैद्यनाथची पहिलीच निवडणूक पार पडली. दोघांच्या एकत्रित येण्याने आम्हाला ही निवडणूक अतिशय सोपी गेली. विरोधी गटामुळे निवडणूक लादली गेली, ज्यामुळे बँकेचाही निवडणूक खर्च झाला. नाहीतर निवडणूक बिनविरोध झाली असती.

भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांनी वैद्यनाथ अर्बन बँक स्थापन केली होती. परळीच्या तत्कालिन नेत्यांना सोबत घेऊन राजकारणाला समाजकारणाची जोड देण्यासाठी त्यांनी वैद्यनाथ अर्बन बँक सुरू केली. मुंडे यांच्या हयातीत बँकेची सूत्रे त्यांच्याकडेच राहिली. त्यांच्या पश्चात पंकजा मुंडे यांच्याकडे बँकेची सूत्रे गेली. परळी अर्बन बँकेच्या शाखा बीड, धाराशिव, सोलापूर, नवी मुंबई, पुणे आदी जिल्ह्यांत आहे.

## महाराष्ट्र पोलीस

निगडीत निर्णय घेण्यात आले.देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह विभाग आहे. या विभागात, महाराष्ट्र पोलिस (झेश्रळलश) दलात १५,००० जागांवर भरतीचा निर्णय घेत, त्यास मंजुरीही देण्यात आली. ही भरती प्रक्रिया लांबली होती. पण आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झाल्याची माहिती समोर येताच, भरतीची तयारी करणाऱ्या युवकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

याशिवाय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढीचा निर्णय झाला. सोलापूर-पुणे-मुंबई हवाई प्रवासाकरिता तळरलळश्रळीं ऋर्ळिपवळपस निधी देण्याचा निर्णयाला देखील मंजुरी देण्यात आली.तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतील जामीनदाराच्या अटी शिथिल करण्याबरोबरच सरकारी हमीस पाच वर्षासाठी मुदतवाढीचा देखील निर्णय बैठकीत झाला.राज्य मंत्रिमंडळाची बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाही. ते श्रीनगरमध्ये होते. त्यामुळे ते बैठकीला ऑनलाईन उपस्थित राहिले. मंत्री भरत गोगावले बैठकीला उपस्थित नव्हते. ते नाराज होऊन दिल्लीला गेल्याची चर्चा आहे. परंतु त्यांचे दिल्लीला महत्त्वाचे काम असल्याने बैठकीला उपस्थित राहू शकले नसल्याचे सांगण्यात येत होते.

## पदावरून हटवण्याची

मुख्य न्यायाधीशाच्या मतानुसार या प्रकरणात सखोल चौकशी आवश्यक आहे, असं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले. तक्रारीच स्वरुप लक्षात घेता, त्यांना पदावरुन हटवण्याची प्रक्रिया नियमानुसार सुरु करणं आवश्यक आहे. हा प्रस्ताव योग्य असल्याने मी मंजुरी दिली आहे. पदावरुन हटवण्याच्या विनंतीवर चौकशी समिती बनवली आहे असं स्पीकर ओम बिर्ला म्हणाले.या समितीमध्ये यात सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश जस्टिस अरविंद कुमार, मद्रास हायकोर्टाचे जस्टिस मनिंदर मोहन श्रीवास्तव आणि कर्नाटक उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश आणि वरिष्ठ कायदेतज्ञ बी. वी. आचार्य यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीच्या रिपोर्टनंतरच जस्टिस वर्मा यांच्याविरोधात पुढील कारवाई केली जाईल असं स्पीकर ओम बिर्ला म्हणाले.

दिल्ली हायकोर्टाचे माजी न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या सरकारी बंगल्यावर याचवर्षी होळीच्या दिवशी आग लागली होती. आग विझवण्यासाठी पोहोचलेले अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पोलिसांना घटनास्थळी मोठ्या प्रमाणात अर्ध्या जळालेल्या नोटा मिळाल्या होत्या. त्यानंतर त्यांनी दिल्ली हायकोर्टाच्या चीफ जस्टिसकडे तक्रार केली. सुप्रीम कोर्टाला या बद्दल सूचित केलं. सर्वोच्च न्यायालयाने त्यानंतर न्यायाधीश वर्मा यांची अलहाबाद हायकोर्टात ट्रान्सफर करुन अंतर्गत चौकशी समिती बनवली.

मीडिया रिपोर्ट्नुसार सुप्रीम कोर्टाच्या या तपास समितीला न्यायाधीश वर्मा यांच्या विरुद्धचे आरोप योग्य आढळले. या दरम्यान वर्मा यांना न्यायाधीश पदावरुन हटवण्यासाठी संसदेत महाभियोगाची तयारी सुरु झाली. न्यायाधीश वर्मा यांनी स्वत:ला निर्दोष ठरवत या सर्व आरोपांना कारस्थान ठरवलं.

डीके उपाध्याय यांचा २५ पानी तपास अहवाल

दिल्ली हाय कोर्टाचे मुख्य न्यायाधीश डीके उपाध्याय यांनी २५ पानी तपास अहवाल तयार केला. या तपास अहवालानुसार भारतीय चलनातील चार ते पाच अर्धी जळालेल्या अवस्थेतील नोटांची बंडलं सापडली होती. होळीच्या रात्री जस्टिस वर्मा यांच्या घराला लागलेली आग विझवण्याचे व्हिडिओ आणि फोटोग्राफस आहेत. त्यावेळी नोटा सापडल्या.

जस्टिस वर्मा कोण?

दिल्ली उच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर जी माहितीय, त्यानुसार जस्टिस वर्मा यांची ८ ऑगस्ट १९९२ रोजी वकील म्हणून नोंदणी झाली. १३ ऑक्टोंबर २०१४ रोजी त्यांना अलहाबाद हाय कोर्टाच अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्यात आलं. ११ ऑक्टोंबर २०२१ रोजी दिल्ली हाय कोर्टाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्याआधी १ फेब्रुवारी २०१६ रोजी अलहाबाद हाय कोर्टाचे स्थायी न्यायाधीश म्हणून शपथ घेतली.

## १५ ऑगस्टपासून

अनिवार्य करण्यात आला आहे. या पाससाठी आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड यापैकी कोणतेही शासकीय मान्यताप्राप्त ओळखपत्र सादर करावे लागेल. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर आधार क्रमांकावर आधारित प्रणाली फोटोची ओळख पटवेल आणि संबंधित विभागात थेट प्रवेश मिळेल. अनेक वयोवृद्ध किंवा ग्रामीण भागातील नागरिकांकडे स्मार्टफोन नसल्याने त्यांच्यासाठी 'गार्डन गेट' येथे विशेष काउंटर सुरू करण्यात येणार आहे. या ठिकाणी मंत्रालयातील प्रवेशाकरता ऑनलाईन नोंदणी करून पास दिला जाईल. यामुळे कोणालाही प्रवेशासाठी अडचण येणार नाही, असा दावा प्रशासनाने केला आहे.

'डिजीप्रवेश' हे ॲप अँड्रॉईड आणि आयओएस दोन्ही प्रणालींवर उपलब्ध आहे. मोबाईलवर ऊळसळ झीरींशीह असे शोधून हे ॲप विनामूल्य डाउनलोड करता येईल. ॲपद्वारे नोंदणी करताना आधार क्रमांकाची पडताळणी होईल. नंतर संबंधित विभागात ऑनलाइन 'स्टॉल बुक' करता येईल आणि रांगेत न थांबता प्रवेश मिळेल. संपूर्ण प्रक्रिया तीन मिनिटांपेक्षा कमी वेळेत पूर्ण होईल, असा दावा करण्यात येत आहे. मंत्रालयात दररोज विविध कामांसाठी मोठी गर्दी होत असते. नवीन प्रणालीमुळे अनधिकृत प्रवेश थांबवता येईल, सुरक्षेत वाढ होईल आणि नागरिकांचा वेळ वाचेल. तसेच कोणत्या विभागात कोण आले आहे याचा डिजिटल रेकॉर्ड तयार राहील.

## बीडच्या गुन्हेगारांसारखच

पदार्थ आढळून आले होते. त्यामुळे जिल्हा कारागृह प्रशासनावर प्रश्नचिन्ह देखील उपस्थित होत आहेत.

सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडला बीड जिल्हा कारागृहामध्ये व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत असल्याचा आरोप सर्वात आधी झाला. याच दरम्यान बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपी आणि देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी आमने सामने आले आणि त्यांच्यात हाणामारी झाली. त्यामुळे बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपींची हरसुल कारागृहात रवानगी करण्यात आली. आता याच कारागृहात एका कैद्याकडे मोबाईल आढळून आला. त्यानंतर सतीश भोसले उर्फ खोक्याचे अंमली पदार्थ वाटपावरून वाद झाला. या प्रकरणात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. सिनेस्टाईल पद्धतीने जेल बाहेरून एका रबरी बॉलमध्ये अंमली पदार्थ टाकून तो जेलमध्ये फेकण्यात आला आणि याच बॉलमधील अंमली पदार्थ घेण्यावरून वाद झाला. हाच वाद सोडविण्यासाठी गेलेल्या कारागृह प्रशासनातील अधिकाऱ्यांना देखील धमकावण्यात आले. बाहेरून अंमली पदार्थ पुरविणाऱ्याचा पोलीस शोध घेत आहेत.

वाल्मीक कराड पैशाच्या जोरावर आणि दहशतीच्या जोरावर कारागृह चालवत आहे. त्यामुळे बीड कारागृहातून काढून कराडला गडचिरोलीच्या कारागृहात पाठवावे अशी मागणी शरद पवार गटाचे नेते शिवराज बांगर यांनी केली. सिंडिकेट चालविणारा माणूस हा बीडसारख्या छोट्या कारागृहात आहे. त्यामुळे कराडची जेल बदली का होत नाही? असा सवाल देखील बांगर यांनी उपस्थित केला. तर सतीश भोसले उर्फ खोक्याला देखील बाहेरील कारागृहात हलवले पाहिजे. मोठ-मोठ्या कारागृहात अशा गोष्टी होत असतात. मात्र बीड कारागृहात या गोष्टी पहिल्यांदाच होत असून गुन्हेगारीचा बादशाह हे सर्व घडवून आणत असल्याचा थेट आरोप बांगर यांनी यावेळी केला.

जेल प्रशासनावर आरोप झाल्यानंतर तत्कालीन कारागृह अधीक्षकांची बदली देखील करण्यात आली. त्यांच्या जागी पेट्रस गायकवाड यांची नियुक्ती झाली. मात्र हे अधिकारी देखील वादाच्या भोवऱ्या सापडले आहेत. बीड कारागृहाची १६२ कैद्यांची क्षमता आहे. मात्र या कारागृहात दुप्पट कैदी आहेत. त्यामुळे या सर्व बाबी समोर आल्यानं यावर नियंत्रण कोण ठेवणार? असा प्रश्न उपस्थित होतोय.

बीड जिल्हा कारागृहात बेकायदेशीर रित्या गांजा आणत त्याच्या वाटणीवरून इतर कैद्यांसोबत वाद घालणाऱ्या सतीश भोसले उर्फ खोक्याला संभाजीनगर येथील हरसुल कारागृहात हलवण्यात आले आहे. गांजा आणण्याबरोबरच त्याच्या वाटणीवरून वाद घालणाऱ्या या चौघांवर बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत. दरम्यान या चौघांचा ताबा मिळावा यासाठी न्यायालयात अर्ज देखील करण्यात आलेला आहे. तत्पूर्वीच कारागृह प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून खोक्याला हरसूल कारागृहात हलवले आहे.

## पालक वर्गाचे आमरण

कार्यालयासमोर मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११:३० पासून पालक वर्ग आमरण उपोषणावर बसला असून, शिक्षण विभागाकडून तात्काळ ठोस कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख चार प्रमुख मागण्या

उपोषणकर्त्यांनी मिलीया प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या संदर्भात खालील चार मागण्या मांडल्या आहेत:

१. प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वेळापत्रक सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत एकसमान करावे.

२. शाळा व्यवस्थापन समितीची नियुक्ती तातडीने करावी.

३. सर्व शिक्षक आणि कर्मचारी मुख्यालयातच वास्तव्यास राहतील याची खात्री करून आदेश द्यावेत.

४. दर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी पालक मेळावा आयोजित करावा.

पालकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही महिन्यांपासून शाळेतील शिक्षकांकडून वेळापत्रकाचे पालन होत नसून, मुख्यालयाबाहेर वास्तव्यास राहणाऱ्या शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमावर गंभीर परिणाम होत आहे. मिलीया प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या वेळापत्रक व उपस्थितीच्या प्रश्नासोबतच पालक वर्गाने संस्थेच्या संपूर्ण भरती प्रक्रियेवरही गंभीर आरोप केले आहेत. अंजुमन इश-ते-तालीम संस्थेच्या अधिपत्याखालील शाळांमध्ये शिक्षक भरती ही पूर्णतः अपारदर्शक, अनैतिक आणि पक्षपाती पद्धतीने पार पडल्याचा पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा दावा आहे.त्यांच्या मते, या भरतीमध्ये गुणवत्तेचे, पात्रतेचे किंवा अनुभवाचे कोणतेही मापदंड पाळले गेले नाहीत. उलट आर्थिक देवाणघेवाण, नातेवाईकांना प्राधान्य आणि जातीय-सामाजिक जवळीक या आधारे नियुक्त्या करण्यात आल्या. परिणामी शैक्षणिक पात्रता नसलेल्या, अनुभवहीन व्यक्तींना शिक्षक या संवेदनशील पदावर नेमण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ऱ्हास झाला आहे.

या कथित अपात्र भरती व अनियमित कारभारामुळे अनेक शाळांमध्ये शिक्षकांची उपस्थिती अनियमित आहे. अध्यापन क्षमता कमी, अभ्यासक्रम अपूर्ण, परीक्षांची अपुरी तयारी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीत अडथळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी केवळ नावापुरते शिक्षण देऊन प्रमाणपत्रे देण्याची प्रवृत्ती वाढल्याचा आरोपही करण्यात आला आहे. पालकांचे म्हणणे आहे की, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आशा घेऊन आम्ही मुलांना या शाळांमध्ये घातले. पण प्रत्यक्षात दर्जा खालावला असून मुलांचे मनोबल खचले आहे.

या गंभीर परिस्थितीत पालक प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक अभ्यासकांनी एकत्र येत जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना सखोल चौकशी, अपात्र शिक्षकांना तात्काळ हटविणे, भरती प्रक्रियेची फेरतपासणी व गुणवत्ताधिष्ठित पुनर्नियुक्तीची मागणी केली आहे. त्यांनी इशारा दिला आहे की, जर तात्काळ कारवाई झाली नाही, तर आम्ही मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी व पालकांसह रस्त्यावर उतरू. भरती प्रक्रिया निलंबित करून चौकशी आदेश लागू करावेत, ही जनतेची आणि पालकांची एकमुखी मागणी आहे.